सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
यलोगेट पोलीस ठाणे, पहिला माळा, सिंदुर ब्रिज जवळ,
पी.डी. मेलो रोड, मुंबई-४००००१

Tel :- 022 22621620
E mail ID - dcpzoneport-mum@mahapolice.gov.in

जा.क्र.११०६/पोउआ/बंप/वा/२०२६ दिनांक -०६/०४/२०२६

प्रति,

मा.पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, मुंबई.

विषय - न्यायालयीन प्रकरणांचा निकाल तपासी यंत्रणा अथवा सरकारी अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्याविरूध्द गेला असल्यास संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल.

संदर्भ - १) शासन निर्णय क्र. डीपीपी २०१५/प्र.क्र.५१/पोल१०, दि.२६/०२/२०१९
२) जा.क्र.४६८/पोउआ/प्रकटीकरण/गु.शा,गु.अ.वि/२०१६,
दि.०६/०४/२०१६
३) जा.क्र. २९८८/बंप/वा/२०२५ , दि.१३/१२/२०२५

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून अहवाल सादर करण्यात येतो की, पोलीस उप-आयुक्त, बंदर परिमंडळ कार्यालयामध्ये शासन निर्णय क्र. डीपीपी २०१५/प्र.क्र.५१/पोल - १०, दि.१७/१०/२०१५ नुसार न्यायालयीन प्रकरणांचा निकाल तपासी यंत्रणा अथवा सरकारी अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्याविरुध्द गेला असल्यास संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीच्या तिमाही बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

सदर बैठकीकरिता बंदर परिमंडळ मधील वडाळा आणि शिवडी पोलीस ठाणचे पोलीस निरिक्षक (गुन्हे ), विधी अधिकारी, परिमंडळ ०१ (अतिरिक्त कार्यभार- बंदर परिमंडळ),मुंबई हे सदस्य उपस्थित होते. समितीच्या बैठकींमध्ये बंदर परिमंडळ अंतर्गत माहे जानेवारी ते मार्च २०२६ या तीन महिन्याचे काळात दोषमुक्त झालेल्या ०४ खटल्यांच्या न्यायनिर्णयांची तपासणी करण्यात आली आहे. त्याची माहिती सोबत जोडुन सादर करण्यात येत आहे.

(विजयकांत सागर)
पोलीस उप आयुक्त,
बंदर परिमंडळ,मुंबई.

Pdr
08/04

Dy. Commissioner of Police (Detection)
Crime Branch C I D Mumbai
पोउआ (प्रकटीकरण)
दिनांक / / २०

Scanned with CamScanner

आयुक्तालय / पोलीस अधिक्षक कार्यालय :- पोलीस उप आयुक्त, बंदर परिमंडळ, मुंबई समितीच्या बैठकीचा दिनांक :- दिनांक - ०७/०१/२०२६

| अ. क्र. | प्रकरण क्रमांक / मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरूप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णयानुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांची नांव, त्यांच्या विरुध्द केलेली/ प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | सेशन कोर्ट केस क्र.६२२/२०१९ | वडाळा पोलीस ठाणे गु.र.क्र. १५४/२०१९ कलम ३५४ (अ) भा. दं.सं १८६० सहकलम ८,१२ पोक्सो अधिनियम २०१२ | दि. १८/१०/२०१९ | दि. ०८/०१/२०२६ | १) बळीत मुलीच्या वयाचा पुरावा सादर केला नाही,शाळेचा दाखला वयाचा पुरावा मानला गेला नाही.<br><br>२) स्वतंत्र साक्षीदार जसे की शेजारी घटनास्थळी हजर असणारे परिसरामधील रहिवाशी यांचे जबाब नोंदवण्यात आले नाहीत.<br><br>३) बळीत मुलगी आणि तिचे वडील यातील फिर्यादी यांच्या साक्षीमध्ये विसंगती मिळून आली आहे.<br><br>४) दुकानाचे मालकीपत्र, चॉकलेटचा पुरावा प्राप्त केले नाही, तसेच बळीत मुलीची तक्रार आणि एफआयआरमधील मजकुरामध्ये तफावत आहे.<br><br>५) यातील बळीत मुलीच्या वैदयकीय तपासणीमध्ये तिच्या शरीरावर कोणत्याही प्रकारची जखम वगैरे मिळून आली नाही.<br><br>६) घटनास्थळ पंचनाम्यामध्ये बळीत मुलीच्या सख्ख्या काकाला पंच म्हणून घेतले. तसेच पंचानी | तपासी अधिकारी यांचे तपासातील उणीवा दिसुन येत आहेत. | गुन्हयाचे तपासी अधिकारी म.स. पो.नि.सहारा शेख यांचा मा. अपोआ दप्रावि,मुंबई यांना अहवाल सादर करण्यात आलेला आहे. | |

Scanned with CamScanner

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | घटनास्थळ पंचनाम्यावर पोलीस ठाण्यामध्ये सही केल्याचे उलटतपासणीमध्ये सांगितले.<br><br>७) प्रथम खबरी अहवाला वर अंगठयाचा ठसा आहे,परंतु त्याखाली कोणाचेही नाव नसून कोणाचा आहे याबाबत उल्लेख नाही.<br><br>एकंदरीत गुन्हयाचा तपासामध्ये तपासी अधिकारी यांनी तपासात योग्य दक्षता घेतलेली नाही. तसेच गुन्हयातील फिर्यादी आणि मुलीच्या जबाबामध्ये विसंगती असल्याने पुराव्या अभावी आरोपीस निर्दोष मुक्त केल्याचे दिसुन येत आहे. | | |
| ०२ | सेशन केस नं. ३२५/१४ | शिवडी पोलीस ठाणे गु.र.क्र ४१/२०११ कलम ३०७,११४,१२०(ब) ३४ भादवि सह ३,२५ आर्म ॲक्ट | दि. ०५/०५/२०११ | दि. ०७/०१/२०२६ | १)गुन्हयातील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांनी साक्षी दरम्यान गोळी बार करणारा मुख्य आरोपी मोहसीन आलम हाच होता व त्यावेळी इतर आरोपी देवेंद्र चव्हाण व राजु जाधव घटनास्थळी उपस्थित नव्हते असे सांगितले.<br><br>२) प्रथम खबरी अहवालामध्ये आरोपी देवेंद्र चव्हाण व राजु जाधव यांचे नाव नव्हेत फक्त मुख्य आरोपी मोहसीन चा उल्लेख होता.<br><br>३) गुन्हयात वापरलेला देशी कट्टा गोळया कपडे फक्त मुख्य आरोपी मोहम्मद आलम यांच्याकडूनच जप्त झाले आरोपी देवेंद्र चव्हाण किंवा राजु जाधव यांच्या विरूध्द कोणताही पुरावा मिळाला नाही.<br><br>४) पंच व साक्षीदार यांची साक्ष विश्वसार्ह ठरली नाही विरोधाभास होता. | नाही | - |

Scanned with CamScanner

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ५) यातील मुख्य आरोपी जो मयत झाला आहे त्या मोहीन आलम यानेच गोळीबार केल्याचे स्पष्ट होते परंतु आरोपी देवेंद्र चव्हाण व राजु जाधव यांचा थेट किंवा अप्रत्यक्ष सहभाग सिध्द झाला नाही म्हणुन दोघांची निर्दोष सुटका करण्यात आली.<br><br>एकदंरीत परिस्थितीजन्य पुराव्या अभावी सदर गुन्हयामध्ये आरोपीतांची निर्दोष मुक्तता झाल्याने दिसुन येत आहे. | | |
| ०३ | सेशन केस क. १५/८६ | शिवडी पोलीस ठाणे, गु.र.क्र १०९/१९८४ ३७६,३६३ भादवि | दि. २३/०१/१९८६ | दि. ०९/०१/२०२६ | १)यातील आरोपी फरार आहे. तक्रारदार २० वर्षापुर्वी मरण पावला आहे. तसेच इतर ०४ साक्षीदार शोधुनही सापडलेले नाहीत.<br><br>२) गुन्हयातील पिडीतेची साक्ष सन २०११ मध्ये नोंदविण्यात आलेली होती त्यामध्ये तिने स्वत: आरोपी बरोबर घर सोडून गेल्याचे व त्याच्यासोबत लग्न केल्याचे व स्वेच्छेने फिजीकल रिलेशन ठेवल्याचे सांगितले आहे.<br><br>३) गुन्हयात वैद्यकिय अहवाल नाही, इतर साक्षीदार नाहीत, पिडीतेच्या जन्मतारखेचा स्पष्ट पुरावा नाही. पिडीता ही मायनर असल्याचा ठोस पुरावा नाही.<br><br>४) सरकारी पक्षाकडे आरोपी विरुध्द पुरेसा पुरावा नाही व भविष्यात सकारात्मक पुरावा येण्याची शक्यता देखिल नाही. त्यामुळे प्रकरण प्रलंबित ठेवण्यास अर्थ नसल्याचे न्यायालयाचे मत झाल्याने न्यायालयाने सीआरपी कलम २२७ अन्वये आरोपीला निर्दोष घोषित केले आहे. | नाही | - |

Scanned with CamScanner

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | एकदंरीत परिस्थितीजन्य पुराव्या अभावी सदर गुन्हयामध्ये आरोपीतांची निर्दोष मुक्तता झाल्याने दिसुन येत आहे. | | |
| ०४ | सेशन केस क २४१/२५ | शिवडी पोलीस ठाणे गु.र.क्र. ३२/२०११ कलम कलम ३३२ भा.द.वि. | दि. १८/०३/२०२५ | दि. २५/०३/२०२६ | १)फिर्यादी हा बीएमसीच्या कचरा वाहनावर कर्तव्यावर असल्याचा दावा करण्यात आला होता परंतु त्याबाबतचा कोणताही डयुटी चार्ट फिर्यादीचे ओळखपत्र त्याच्या वरिष्ठांचे आदेश वगैरे कोर्टात सादर केले नाहीत.<br><br>२)फिर्यादी व तपास अधिकारी यांनी देखिल असे कोणतेही अधिकृत कागदपत्रे सादर न केल्याचे उलट तपासात कबुल केले.<br><br>३)घटना दि.१७/०२/२०२११ रोजी घडली त्याबाबत प्रथम अदखलपात्र गन्हा नोंद करण्यात आला नंतर बीएमसी संघटनेच्या दबाव आल्यानंतर घटनेच्या १० दिवसानंतर दिनांक २७/०३/२०११ रोजी एफआय आर नोंदविली गेली हे तपासी अधिकारी यांनी उलट तपासात कबुल केले. फिर्यादीला बांबुने मारल्याचा दावा करण्यात आला होता परंतु त्याबाबतचा कोणताही वैद्यकिय अहवाल | होय | सदर गुन्हयाचे तपासी अधिकारी पोउपनि म्हापुणकर हे सन २०१७ मध्ये सेवा निवृत्त झालेले असुन विभागीय चौकशी नियमपुस्तिका १९९१ नियम १२.३ नुसार त्यांच्या सेवानिवृत्तीस ०४ वर्षापेक्षा जास्त कालावधी होवुन गेल्याने त्यांच्या कसुरी बद्दल कारवाई करता येत नाही. |

Scanned with CamScanner

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | सादर करण्यात आला नाही.त्यामुळे इजा झालेला पुरावा मिळाला नाही.<br><br>४) घटना सार्वजनिक रस्त्यावर घडलेली होती असे असताना देखिल कोणतेही साक्षीदार तपासले गेले नाही, फक्त फिर्यादी त्याचा सहकारी व तपास अधिकारी यांच्याच साक्षी नोदविल्या गेल्या.<br><br>५) आरोपीने वापरलेला बांबु जप्त करण्यात आलेला आहे,परंतु तो कोर्टात सादर केला नाही.<br><br>सदरची फिर्याद ही उशिरा दाखल आहे. सदर गुन्हयाच्या तपासामध्ये त्रुटी आढळुन आल्या तरी सदर तपास अधिकारी हे सेवानिवृत्त असल्याने याबाबत त्यांचा सहानभुतीपुर्वक विचार करण्यात आलेला आहे. | | |

Scanned with CamScanner